# जिल्हा व सत्र न्यायालय – जळगांव.

## जा ही र नि वि दा.

अभिलेख शाखा जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव येथील रूम नं डी1 ते डी 3, डी 6 ते डी 7अ, 7ब मध्ये कागदपत्रे खराब होउ नये याकरीता वाळवी प्रतिबंधक फवारणी (पेस्ट कन्टोल ) होवुन मिळावी करीता पेस्ट कन्टोल करणा–या पुरवठाकारांना या जाहीर निविदेद्वारे कळविण्यांत येते की, अभिलेख शाखा जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव कार्यालयात पेस्ट कन्टोल करावयाचे आहेत. तरी याकामी ज्या पुरवठाकारांना स्वारस्य असेल त्यांनी त्यांची दरपत्रके बंद लिफाफ्यात म. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव या नावाने पाकिटावर " पेस्ट कन्टोल " असे नमुद करुन पाकीटे प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव कक्ष कमांक 101 मध्ये दिनांक 02/08/2024 पर्यंत कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन दिवशी सादर करावीत अथवा समक्ष आणून दयावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. दरपत्रके दिनांक 03/08/2024 रोजी सकाळी 10.30 वाजता म. जिल्हा व सत्र न्यायाधीश. 1, जळगांव यांचे निजी कक्षात उघडले जातील.

अभिलेख शाखा जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव येथील पेस्ट कन्टोल खालील प्रमाणे उधारीवर करावयाची आहेत.

| अ.नं. | तपशील |
|---|---|
| 1 | अभिलेख शाखा जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव येथील रूम नं डी1 ते डी 3, डी 6 ते डी 7अ, 7ब |

## सर्वसाधारण अटी.

1. दरपत्रक स्विकृत केल्यावर आदेश दिल्यानंतर सदरचे विभागात पेस्ट कन्टोल त्वरीत करून मिळावे सदरील साहित्याचा दर्जा उत्कृष्ट आणि उच्च प्रतीचा Genuine (Original) असावा नसल्यास स्विकारला जाणार नाही.

2. दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारणेचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांच्याकडेस राखून ठेवण्यांत आलेला आहे. दरपत्रक भरतांना दर अंकात व अक्षरी असे दोन्ही प्रकारे भरावेत.

3. सदरील काम संपुर्ण झाल्यावर उधारीचे देयक तीन प्रतीत सादर करावे.

4. दरपत्रक भरतांना सर्व करांसह दरपत्रक भरावे. मात्र जीएसटी टॅक्सचा स्वतंत्र दर नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जाते त्या अटीस आधीन राहून दरपत्रक दयावे लागेल तसेच बिलाची रक्कम अदा करतांना नियमानुसार टी.डी.एस. कपात करण्यांत येईल.

.........2

5. उपरोक्त काम अनुदानाअभावी कमी जास्त प्रमाणात करण्याचे अधिकार म. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जळगांव यांच्या कडेस राखून ठेवण्यात आलेले आहेत. तसेच उपरोक्त काम उधारीवर करावयाचे आहेत. तसेच सदर बीलाची रक्कम अनुदान उपलब्धतेनुसार देण्यांत येईल.

6. दरपत्रक उघडण्याच्या दिवशी व नमुद वेळी दरपत्रक पाठविणा-यांनी प्रत्यक्ष हजर रहावे अथवा प्रतिनिधी पाठवावा अन्यथा त्यांच्या गैरहजेरीत दरपत्रक उघडणेत येतील.

7. दरपत्रकातील दर दिनांक 31.12.2024 अखेर कार्यरत राहतील. अगर त्यानंतरही त्याच दरात पुरविली जातील त्या कालावधीचा खुलासा स्पष्ट करावा.

8. नमुद वस्तूंचा पुरवठा आदेश देवूनही मुदतीत न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांनी राखून ठेवला आहे.

४०८६
म.जा.क./ /2024.
जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव
दिनांक. 25/07/2024.

VSKamkar
प्र. प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव

<u>प्रत माहिती करीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता.</u>

1. म.जिल्हाधिकारी,जळगांव.
2. म.तहसिलदार,जळगांव.
3. म.दिवाणी न्यायाधिश व.स्तर,जळगांव.
4. जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.
5. मुख्य न्यायदंडाधिकारी,जळगांव.
6. जिल्हा व सत्र न्यायालयाच्या संकेतस्थळावर.